

Media Speak

OCT – 2026



Conglomeration of Raisoni News in Print Media



Hon'ble Late
Shri. Gyanchandji Raisoni

raisoni
EDUCATION

Inspiration

Artificial Intelligence is no longer a technology of the future; it is already shaping the world around us. From education and healthcare to business and communication, AI is changing how we think, work, and solve problems. For today's students, understanding AI is becoming an important step towards building a successful future.

To stay ahead, students must go beyond traditional learning and develop new skills. They should explore AI tools, learn the basics of coding, understand data, and discover how technology can solve real-world problems. Equally important is the ability to ask the right questions, analyse information, think creatively, and make informed decisions.

However, upgrading oneself for the AI era does not mean depending entirely on technology. Students must strengthen their communication, teamwork, leadership, and problem-solving abilities. These human skills, combined with technological knowledge, will help them stand out in a competitive world.


I encourage students to remain curious, experiment with new tools, learn from their mistakes, and never stop upgrading their knowledge. Teachers and educational institutions must also create opportunities for practical learning and responsible use of AI.

Remember, the future will not belong only to those who use AI, but to those who know how to use it wisely, creatively, and responsibly.



Shri. Sunil Raisoni
Chairman
Raisoni Group of Institutions

raisoni
EDUCATION



Raisoni Education Media Coverage

दैनिक दिव्य मराठी

Thursday 01/10/2026

जी. एच. रायसोनी कॉलेजमधील प्रोजेक्ट प्रेझेंटेशनमध्ये विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

प्रतिनिधी | जळगाव

जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटमध्ये अभियांत्रिकी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'प्रोजेक्ट प्रेझेंटेशन' उपक्रम नुकताच झाला. यात विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी ' एआय, सायबर सुरक्षा, डेटा सायन्स, आयओटी, स्मार्ट ऊर्जा, ई-मोबिलिटी, ऑटोमेशन आणि रोबोटिक्सवर आधारित प्रकल्प सादर करून प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित उपाय मांडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन संचालिका प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी प्रदर्शनाची पाहणी करत विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाचे आणि तांत्रिक कौशल्याचे कौतुक केले. अंतिम वर्षातील प्रकल्प केवळ अभ्यासक्रमाचा भाग नसून, सर्जनशीलता, संशोधन क्षमता आणि व्यावहारिक कौशल्यांना दिशा देणारे व्यासपीठ आहे. प्रकल्प समाज व उद्योगासाठी उपयुक्त कसा ठरेल, याचा विचार आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. अध्यक्ष सुनील रायसोनी यांनीही विद्यार्थ्यांच्या या संशोधनात्मक उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी यावेळी अकॅडमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत, प्रा. डॉ. शंतनू पवार, प्रा. डॉ. मुकुंद पाटील, प्रा. डॉ. बिपासा पात्रा, प्रा. डॉ. चेतन चौधरी, प्रा. डॉ. तुषार पाटील, प्रा. डॉ. स्वाती पाटील उपस्थित होते.



रायसोनी महाविद्यालयात तंत्रज्ञानावरील प्रोजेक्टमधून उपाय सांगताना विद्यार्थ्यांनी.

raisoni EDUCATION

Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

नवभारत
Thursday 01/10/2026

कार्यक्रम : जी.एच. रायसोनी विश्वविद्यालय में आयोजन

उत्साह से मनाया विश्व फार्मासिस्ट दिन

■ अमरावती, ब्यूरो. जी.एच. रायसोनी विश्वविद्यालय, अमरावती (जीएचआरयूए) के स्कूल ऑफ फार्मेसी में विश्व फार्मासिस्ट दिवस का आयोजन किया गया. इस अवसर पर शैक्षणिक, सामाजिक एवं व्यावसायिक गतिविधियां आयोजित की गई. इस वर्ष की थीम "एक स्वस्थ भविष्य के लिए फार्मासिस्टों को सशक्त बनाना" रखी गई, जिसमें रोगी देखभाल, सार्वजनिक स्वास्थ्य एवं समाज के कल्याण में फार्मासिस्टों की महत्वपूर्ण भूमिका पर प्रकाश डाला गया. कार्यक्रम का उद्घाटन कुलपति डॉ. विनायक देशपांडे ने किया. कार्यक्रम की शुरुआत छात्र फोरम के औपचारिक उद्घाटन से हुई. यह फोरम छात्रों में नेतृत्व क्षमता, रचनात्मकता, टीमवर्क, संचार कौशल एवं व्यावसायिक दक्षता विकसित करने के उद्देश्य से शुरू किया गया है. इस अवसर पर छात्रों ने पोस्टर प्रस्तुति एवं पोस्टर मेकिंग प्रतियोगिता, वृक्षारोपण अभियान तथा रक्तदान शिविर में सक्रिय रूप से भाग लिया. इन गतिविधियों के माध्यम से छात्रों ने अपनी रचनात्मकता, वैज्ञानिक ज्ञान, सामाजिक जिम्मेदारी तथा स्वास्थ्य एवं पर्यावरण संरक्षण के प्रति प्रतिबद्धता प्रदर्शित की. मुख्य अतिथि महाराष्ट्र राज्य फार्मेसी काउंसिल के समन्वयक तथा ड्रगिस्ट्स एंड केमिस्ट्स एसोसिएशन के सचिव डॉ. सागर आंदे ने दिन विशेष पर आधारित विशेष व्याख्यान दिया.



स्वस्थ समाज के निर्माण में पेशे के योगदान पर डाला प्रकाश

उन्होंने फार्मासिस्टों की बदलती भूमिका, रोगी-केंद्रित देखभाल के महत्व तथा स्वस्थ समाज के निर्माण में इस पेशे के योगदान पर प्रकाश डाला. इस अवसर पर कुलपति डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल एवं छात्र कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट ने विभिन्न प्रतियोगिताओं के विजेताओं को पुरस्कार एवं प्रमाणपत्र प्रदान कर सभी प्रतिभागियों की सराहना की. कार्यक्रम का आयोजन स्कूल ऑफ फार्मेसी के अधिष्ठाता डॉ. नरेंद्र चंद्रा तथा समन्वयक डॉ.बी.वी. नागार्जुन, डॉ. सचिन पडोले एवं सहायक प्रो. अल्ताफ खान के मार्गदर्शन में एनएसएस अधिकारी सहायक प्रो. कैलाश वाघवानी, डॉ. चैताली निमजे, सहायक प्रो. करुणा माकेश्वर, प्रो. मेघा कोसरकर, प्रो. समिक्षा अजमीरे, प्रो. कृतिका हाडोले एवं प्रो. तन्वी कोकाटे की समिति द्वारा किया गया. शिक्षकेत्तर कर्मचारियों रूपेश कलम्बे एवं गौरव इसल ने भी व्यवस्थाओं में सहयोग दिया.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

नवराष्ट्र
Thursday 01/10/2026

विद्यापीठातर्फे विविध उपक्रम ● फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित

रायसोनीत जागतिक फॉर्मासिस्ट दिन

▸ **अमरावती, ब्युरो.** जी. एच. रायसोनी विद्यापीठातील स्कूल ऑफ फार्मसीमध्ये जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात पार पडला. यानिमित्त शैक्षणिक, सामाजिक तसेच व्यावसायिक स्वरूपाच्या विविध उपक्रम घेण्यात आले. यावर्षीची 'निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टना सक्षम करणे' ही संकल्पना होती.

यामध्ये रुग्णसेवा, सार्वजनिक आरोग्य आणि समाजाच्या कल्याणात फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्यात आली.कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उपक्रमाची सुरुवात विद्यार्थी फोरमच्या औपचारिक उद्घाटनाने करण्यात आली.

स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. नरेंद्र चंद्रा तसेच समन्वयक डॉ. बी. व्ही. नागार्जुन, डॉ. सचिन पडोले आणि सहाय्यक प्रा. अल्ताफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले.



रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सर्जनशीलता, सांघिक कार्य, संवादकौशल्य आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने या फोरमची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण व पोस्टर निर्मिती स्पर्धा, वृक्षारोपण अभियान तसेच रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता, वैज्ञानिक ज्ञान, सामाजिक बांधिलकी तसेच आरोग्य व पर्यावरण संवर्धनाप्रती असलेली जाणीव व्यक्त केली.

एनएसएस अधिकारी सहायक प्रा. कैलास वाधवानी, डॉ. चैताली निमजे, सहाय्यक प्रा. करुणा माकेश्वर, प्रा. मेघा कोसरकर, प्रा. समीक्षा अजमीरे, प्रा. कृतिका हाडोले आणि प्रा. तन्वी कोकाटे यांच्या समितीने उपक्रमाचे नियोजन केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

लोकमत
Thursday 01/10/2026

स्वच्छतेच्या जागृतीसाठी चित्रकला होणार स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणे च्या 'सामवेद' स्कूल ऑफ आर्ट, म्युझिक, व्हिज्युअलायझेशन, एंटरटेनमेंट अँड डिझाइन आणि पुणे महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने 'रंगातून स्वच्छ पुणे निरोगी पुणे!' या संकल्पनेवर आधारित चित्रकला स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे २ ऑक्टोबर रोजी ही स्पर्धा होणार आहे. चित्रकला स्पर्धेसाठी तीन वयोगट निश्चित केले आहेत. ५ ते १२ वर्षे, १३ ते १८ वर्षे आणि १८ वर्षावरील असे हे तीन गट आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना चषक व सर्व कलाकारांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक विश्वजगत

Monday 05/10/2026

'रंगातून स्वच्छ पुणे, स्वच्छतेतून निरोगी पुणे!'

'रायसो'च्या चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद, 260 स्पर्धकांचा सहभाग, स्पर्धकांनी कुंचल्यातून साकारला सामाजिक संदेश

प्रतिनिधी : दै.विश्वजगत

पुणे : -स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पुण्याचा संदेश कलेच्या माध्यमातून जनमानसापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणेच्या सामवेद स्कूल ऑफ आर्ट, म्युझिक, व्हिज्युअलायझेशन, एंटरटेनमेंट अँड डिझाइन आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'रंगातून स्वच्छ पुणे-स्वच्छतेतून निरोगी पुणे!' या चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शुक्रवार, 2 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी महाराज उद्यान, जंगली महाराज मार्ग, शिवाजीनगर येथे झालेल्या या स्पर्धेत तब्बल 260 स्पर्धकांनी सहभाग घेतला. तीनही वयोगटांतील विद्यार्थी, कलाकार आणि चित्रकला प्रेमींनी आपल्या कुंचल्यातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनाचा संदेश प्रभावीपणे मांडला. रायसोनी एज्युकेशनचे संचालक सुनील रायसोनी व श्रेयस रायसोनी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर. डी. खराडकर होते. विख्यात चित्रकार तथा भारती विद्यापीठ फाइन आर्ट्स कॉलेज, पुणेचे उपप्राचार्य रुपेश पवार तसेच चित्रकार रामचंद्र शिवाजी खरटमल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. पुणे महापालिकेचे सह आयुक्त डॉ. अशोक घोरपडे यांचे सहकार्य लाभले. सामवेदचे अधिष्ठाता डॉ. अविनाश काटे, प्रा.देवेंद्र पोटदुखे, प्रा. मधुकर चंदनशिव यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रथमेश केसकर, अमित कांबळे तसेच पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. आयोजकांच्या नियोजनामुळे स्पर्धा शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.









कुंचल्यातून स्वच्छ पुण्याचा संदेश

पुणे शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्याबाबत जनजागृती व्हावी, तसेच स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, हा विचार चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वच्छ पुणे-सुंदर पुणे! माझे पुणे-माझी जबाबदारी!' हा संदेश केंद्रस्थानी ठेवून स्पर्धकांनी विविध चित्रांतून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्त वातावरण आणि निरोगी पुण्याचे चित्र साकारले. या उपक्रमाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश आणि चित्रातून पर्यावरण संवर्धनाचा विचार नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांसह विविध वयोगटांतील कलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने संपूर्ण परिसरात कलात्मक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.

तीन गटांत विजेत्यांची निवड

स्पर्धेसाठी 5 ते 12 वर्षे, 13 ते 18 वर्षे आणि 18 वर्षांवरील अशा तीन वयोगटांची विभागणी करण्यात आली होती.

'अ' गटामध्ये प्रथम क्रमांक इंद्रायणी नार्वेकर, द्वितीय क्रमांक समीक्षा इगवे, तृतीय क्रमांक पलक भुतडा, तर चतुर्थ क्रमांक आर्यवी मोहिते यांनी पटकावला. 'ब' गटामध्ये प्रथम क्रमांक ओवी शेलार, द्वितीय क्रमांक तेजस्वी मोहिते, तर तृतीय क्रमांक अद्वैत क्षत्रिय यांनी मिळविला.

'क' गटामध्ये प्रथम क्रमांक पूर्वा खारकर, द्वितीय क्रमांक अभिषेक पटेल, तर तृतीय क्रमांक शुभांगी वाडीभस्मे यांनी पटकावला.याशिवाय विशेष स्पर्धक प्रसाद महेश जुगे याला 'स्पेशल चाइल्ड' विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सर्व सहभागींचा प्रमाणपत्र देऊन गौरव

स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके व चषक प्रदान करण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. त्यामुळे स्पर्धा केवळ विजेत्यांपुरती मर्यादित न राहता प्रत्येक सहभागीच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारी ठरली.

raisoni EDUCATION

Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

LOKMAT TIMES
Wednesday 07/10/2026

Young chess players battle for DSO divisional honours

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

Nearly 250 young chess players participated in the two-day DSO Division-Level Chess Competition for Under-14, Under-17 and Under-19 boys and girls organised at the Shraddha Park Auditorium of G H Raisoni Junior College.

Players representing various schools and talukas competed in the championship, showcasing concentration, strategic thinking and patience across the chessboards. The tournament provided a competitive platform for young players to test their skills while upholding the spirit of fair play and sportsmanship.

The competition was inaugurated by international athlete and Shiv Chhatrapati Awardee Madhuri K Gurnule, who made the ceremonial first move to declare the event open. DSO officials Atharva Bhonsale and Shiva Iyer, college principal Vaishali Thakre and Dr Inderjeet Singh Randhawa, Head of the RGI Sports Department, were also present.



Players in action during the chess tournament.

The inaugural ceremony began with the traditional lighting of the lamp. The dignitaries were felicitated with saplings by the college principal and Dr Randhawa.

The event was conducted under the guidance of Principal Thakre, with Sports Teacher Reena Choube and the teaching and non-teaching staff contributing to its smooth organisation. The programme was anchored by Saichitra Naidu Nipane.

The tournament reflected the institution's efforts towards promoting sports and encouraging holistic development among students.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक भास्कर
Thursday 08/10/2026

विभागीय शालेय शतरंज स्पर्धा

खिताबी दावेदारों ने पदक अपने नाम किया

भास्कर खेल | नागपुर. जीएच रायसोनी जूनियर कॉलेज, नागपुर में आयोजित विभागीय शालेय शतरंज प्रतियोगिता



(अंडर-14, अंडर-17 और अंडर-19 बॉयज-गर्ल्स) का सफलतापूर्वक आयोजन किया। स्पर्धा में विभिन्न स्कूलों और तालुकों के लगभग 250 युवा शतरंज खिलाड़ियों ने उत्साहपूर्वक भाग लिया। इसके खिताबी दावेदारों ने शानदार प्रदर्शन करते हुए पदक अपने नाम किए। स्पर्धा का उद्घाटन माधुरी गुरनुले (अंतरराष्ट्रीय एथलीट और शिव छत्रपति पुरस्कार प्राप्त) ने किया। समारोह में क्रीड़ा अधिकारी अथर्व भोंसले, आर्बिटर शिवा अय्यर, प्राचार्य वैशाली ठाकरे और आरजीआई स्पोर्ट्स विभाग के प्रमुख डॉ. इंदरजीत सिंह रंधावा की उपस्थिति रही।

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

सकाळ
Thursday 08/10/2026

रायसोनी महाविद्यालयास 'फोर-स्टार' रेटिंगचा बहुमान

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून गौरव

■ सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. ७ : शहरातील जी. एच. रायसोनी महाविद्यालयाला केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल अंतर्गत कार्यरत इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिलच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी 'फोर-स्टार रेटिंग' प्राप्त झाले आहे.

नवोपक्रम, स्टार्टअप, उद्योजकता आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचारांना चालना देण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या प्रभावी कामगिरीची दखल घेत उत्तर महाराष्ट्रातून एकमेव जी. एच. रायसोनी महाविद्यालयाला हा बहुमान प्रदान करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता कल्पनांना प्रत्यक्ष स्वरूप देणे, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक व औद्योगिक समस्यांवर उपाय शोधणे आणि उद्योजकतेच्या संधी ओळखणे, यासाठी महाविद्यालय सातत्याने विविध व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. हॅकेथॉन, नवोपक्रम स्पर्धा, स्टार्टअपविषयक उपक्रम तसेच विविध राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उल्लेखनीय कामगिरी ही या प्रयत्नांची फलश्रुती आहे.



महाविद्यालयाला मिळालेले फोर-स्टार रेटिंग हे आमच्या विद्यार्थी, प्राध्यापक आणि संपूर्ण संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पना, संशोधनवृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि उद्योजकतेचा दृष्टिकोन विकसित करणे हा आमच्या शैक्षणिक वाटचालीचा महत्त्वाचा भाग आहे.

- प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल, संचालिका

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

हिंदुस्थान
पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक
Thursday 08/10/2026

जी.एच.रायसोनी विद्यापीठात पीएच.डी. शोधार्थ्यांसाठी पाच दिवसीय संशोधन पद्धती वर कार्यशाळा आयोजित



अमरावती दि. ७ : जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयूए) च्या पीएच.डी. सेलने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या बॅच-सातव्याच्या नव्याने प्रवेशित पीएच.डी. शोधार्थ्यांसाठी नुकतेच पाच दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. या कार्यशाळेत ५७ शोधार्थ्यांनी सहभाग घेतला. संशोधन पद्धतीमध्ये मजबूत पाया तयार करणे तसेच सुव्यवस्थित व प्रभावी पीएच.डी. संशोधनासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि नैतिक दृष्टिकोन विकसित करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य अतिथी डॉ. राहुल रालेगांवकर, प्राध्यापक, व्हीएनआयटी नागपूर यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे आणि कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल उपस्थित होते.

पाच दिवस विविध प्रतिष्ठित संस्थांतील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि तज्ज्ञांनी संशोधनाशी संबंधित महत्त्वाच्या पैलूंवर व्याख्याने दिली. यात संशोधनाची मूलभूत तत्त्वे व समस्या निर्माण, संशोधन प्रक्रिया, साहित्य समीक्षा, संशोधन लेखन व विद्वत्तापूर्ण संवाद, नमुना निवड व अनुमान, मापन व आकडेवारी संकलन, संशोधन नैतिकता, शैक्षणिक प्रकाशन, एआय साधनांचा जबाबदार वापर, संशोधन समस्येची ओळख, पीएच.डी.च्या बौद्धिक व मानसिक आव्हाने, शिकलेले ज्ञान व्यवहारात उतरवणे तसेच पाठ्य व दुय्यम आकडेवारीवर आधारित डेटा-ड्रिव्हन व्यवस्थापन संशोधनाच्या संधी या विषयांचा समावेश होता.

कार्यशाळेदरम्यान व्हीएनआयटी नागपूरचे डॉ. राहुल रालेगांवकर व डॉ. प्रांतिक बनर्जी, सी.पी. अँड बेरार ई.एस. कॉलेज, नागपूरचे डॉ. आशीष लिंगे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहम्मद अतीक, आयआयएम नागपूरचे डॉ. कपिल कौशिक तसेच जीएचआरयूएचे कुलगुरू व प्राध्यापक डॉ. श्रीकांत चवाटे, डॉ. सचिन पडोळे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. विश्राम बापट आणि डॉ. स्नेहिल जायसवाल यांनी विविध विषयांवर शोधार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सत्रांमध्ये केवळ पद्धतीगत कौशल्यांवरच नव्हे, तर टीकात्मक तसेच विश्लेषणात्मक विचार, बौद्धिक जिज्ञासा, दृढता, नैतिक जबाबदारी, लवचिकता आणि ज्ञानाला अर्थपूर्ण योगदानामध्ये रूपांतरित करण्याच्या क्षमतेवरही भर देण्यात आला. शोधार्थ्यांनी व्यावहारिक अंतर्दृष्ट्यांचे कौतुक केले. यामुळे त्यांना अधिक स्पष्टता, आत्मविश्वास आणि कठोरतेने डॉक्टरल संशोधन करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे आयोजन पीएच.डी. सेल प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे यांनी केले. डॉ. सचिन पडोळे, डॉ. स्नेहा बोहरा तसेच संपूर्ण पीएच.डी. सेल टीमच्या सदस्यांनी विशेष सहकार्य केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

नवराष्ट्र

Thursday 08/10/2026

रायसोनी ज्युनिअर कॉलेजमध्ये डीएसओ विभागीय बुद्धिबळ स्पर्धा

युवा बुद्धिबळपटूंच्या रणनीतीला धार

▶ **नागपूर, मेट्रो प्रतिनिधी.** श्रद्धा पार्क येथील जीएच रायसोनी ज्युनिअर कॉलेजमध्ये डीएसओ विभागीय दोन दिवसीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या गटातील या स्पर्धेत विविध शाळा तसेच तालुक्यांमधील सुमारे २५० युवा बुद्धिबळपटूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय ॲथलीट व शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खेळाडू माधुरी के. गुरनुले यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. गुरनुले यांनी बुद्धिबळाच्या पटावर पहिली चाल खेळत स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन केले. त्यानंतर खेळाडूंनी उत्साहाने सामने खेळण्यास सुरुवात केली. बुद्धिबळाच्या पटावर खेळाडूंच्या रणनीती, संयम आणि विश्लेषणात्मक क्षमतेची कसोटी पाहायला मिळाली. एकमेकांना कडवी झुंज देताना खेळाडूंनी क्रीडाभावना व शिस्तीचे दर्शन घडविले. विविध डावांमध्ये एकाग्रता, अचूक चाल आणि रणनीतिक कौशल्याचा प्रभावी प्रत्यय आला.



यावेळी जीएच रायसोनी ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली ठाकरे तसेच रायसोनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. इंदरजीत सिंह रंधावा उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष सुनील रायसोनी आणि जीएचआरपीएस व ज्युनिअर कॉलेजच्या संचालिका पलक रायसोनी यांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्थेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

raisoni EDUCATION

Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक दिव्य मराठी
Friday 09/10/2026

जी एच रायसोनी विद्यापीठात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा



अमरावती (प्रतिनिधी) दि. ८ : जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयूए) च्या पीएच.डी. सेलने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या बॅच-सातव्याच्या नव्याने प्रवेशित पीएच.डी. शोधार्थ्यांसाठी नुकतेच पाच दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत ५७ शोधार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य अतिथी नागपूर येथील व्हीएनआयटीचे प्राध्यापक डॉ. राहुल रालेगांवकर यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे आणि कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल उपस्थित होते.

कार्यशाळेदरम्यान व्हीएनआयटी नागपूरचे डॉ. राहुल रालेगांवकर व डॉ. प्रांतिक बनर्जी, सी.पी. अँड बेरार ई.एस. कॉलेज, नागपूरचे डॉ. आशीष लिंगे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहम्मद अतीक, आयआयएम नागपूरचे डॉ. कपिल कौशिक तसेच जीएचआरयूएचे कुलगुरू व प्राध्यापक डॉ. श्रीकांत चवाटे, डॉ. सचिन पडोळे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. विश्राम बापट आणि डॉ. स्नेहिल जायसवाल यांनी विविध विषयांवर शोधार्थ्यांना मार्गदर्शन केले. शोधार्थ्यांनी व्यावहारिक अंतर्दृष्ट्यांचे कौतुक केले. यामुळे त्यांना अधिक स्पष्टता, आत्मविश्वास आणि कठोरतेने डॉक्टरल संशोधन करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे आयोजन पीएच.डी. सेल प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे यांनी केले. डॉ. सचिन पडोळे, डॉ. स्नेहा बोहरा तसेच संपूर्ण पीएच.डी. सेल टीमच्या सदस्यांनी विशेष सहकार्य केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक दिव्य मराठी
Saturday 10/10/2026

इनोव्हेशनमध्ये जी. एच. रायसोनी महाविद्यालयास 'फोर-स्टार रेटिंग'

जळगाव : जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाला केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल अंतर्गत कार्यरत इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिलच्या अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी (IIC 7.0 मध्ये) 'फोर-स्टार रेटिंग' प्राप्त झाले आहे. नवोपक्रम, स्टार्टअप, उद्योजकता आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचारांना चालना देण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांच्या प्रभावी कामगिरीची दखल घेत उत्तर महाराष्ट्रातून एकमेव जी. एच. रायसोनी महाविद्यालयाला हा बहुमान मिळाला आहे.

या कामगिरीसाठी अकॅडमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत, प्रा. डॉ. मुकुंद पाटील, आय.क्यू.ए.सी. विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. योगिता पाटील, प्रा. डॉ. स्वाती पाटील, इन्क्युबेशन सेलच्या प्रभारी प्रा. डॉ. ज्योती जाखेटे, आय.आय.सी. को-ऑर्डिनेटर निलभ दीश यांनी परिश्रम घेतले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जी. एच. रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी व संचालिका प्रीती अग्रवाल यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन केले. (वा. प्र.)



"हे यश म्हणजे विद्यार्थी, प्राध्यापक आणि संपूर्ण संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पना, संशोधनवृत्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि उद्योजकतेचा दृष्टिकोन विकसित करणे हा आमच्या शैक्षणिक वाटचालीचा महत्त्वाचा भाग आहे.

प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल, संचालिका,
जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट, जळगाव

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक पुण्यप्रताप
Tuesday 13/10/2026

जी. एच. रायसोनी महाविद्यालयात एआय, डिजिटल फॉरेन्सिक्स व सायबर सुरक्षेवरील सहा दिवसीय एफडीपीचे उद्घाटन

जळगाव : जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयातील कॉम्प्युटर प्लिकेशन्स विभागाच्या वतीने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अटल योजनेअंतर्गत 'एआय फॉर डिजिटल फॉरेन्सिक्स अँड सायबर सिक्युरिटी : इमर्जिंग ट्रेंड्स अँड प्रॅक्टिकल प्लिकेशन्स' या विषयावरील सहा दिवसीय ऑफलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे (एफडीपी) सोमवारी (ता. १२) उत्साहात उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्सचे सहाय्यक प्राध्यापक आणि सायबर सुरक्षा व डिजिटल फॉरेन्सिक्स क्षेत्रातील तज्ज्ञ प्रा. डॉ. चरणसिंग एन. कायते उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी. एच. रायसोनी इन्स्टीट्युट संचालिका प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल होत्या.



उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. चरणसिंग कायते यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचा प्रवास आणि डिजिटल फॉरेन्सिक्समधील त्याचा वाढता वापर स्पष्ट केला. जनरेटिव्ह एआयमुळे तंत्रज्ञानाचा वापर अधिक व्यापक झाला असला, तरी सायबर गुन्हेगारही नवनवीन तंत्रांचा वापर करत आहेत. त्यामुळे गुन्हे तपासाशी संबंधित तज्ज्ञांनी तंत्रज्ञानातील बदलांशी सातत्याने अद्ययावत राहून गुन्हेगारांच्या पुढे राहणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. या सहा दिवसांच्या प्रशिक्षणातून डिजिटल फॉरेन्सिक्सची कार्यपद्धती, प्रत्यक्ष साधनांचा वापर आणि सायबर सुरक्षेतील आधुनिक आव्हाने समजून घेण्याची संधी सहभागी प्राध्यापकांना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल फॉरेन्सिक्स आणि सायबर सुरक्षा ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील अत्यंत महत्त्वाची क्षेत्रे असल्याचे नमूद केले. आरोग्य, शेती, शिक्षण तसेच गुन्हे तपास आणि आर्थिक फसवणूक उघडकीस आणण्यापर्यंत एआयचा वापर वाढत आहे. असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक करताना अकॅडमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत यांनी प्रा. डॉ. चरणसिंग कायते यांच्या संशोधनकार्याचा व डिजिटल फॉरेन्सिक्स क्षेत्रातील अनुभवाचा परिचय करून दिला. फॉरेन्सिक सायन्स संस्थेतील प्रयोगशाळांना दिलेल्या भेटीदरम्यान सायबर सुरक्षा, मोबाइल फॉरेन्सिक्स आणि फसवणूक तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधांची माहिती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. करिष्मा चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले. सहसमन्वयक प्रा. कल्याणी नेवे यांनी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे प्राध्यापकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान मिळण्यास आणि ते विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होईल, असे मनोगत व्यक्त केले. या एफडीपीअंतर्गत १३ ते १७ ऑक्टोबरदरम्यान विविध तज्ज्ञांची मार्गदर्शक सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या सर्व सत्रांसोबत दररोज प्रात्यक्षिक प्रशिक्षण व प्रयोगशाळेतील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संशोधन लेखांवरील चर्चेच्या माध्यमातून डिजिटल फॉरेन्सिक्स, मालवेअर शोध, एआय-आधारित घुसखोरी शोध प्रणाली आणि स्मार्ट होम व आयओटी प्रणालींच्या सुरक्षेसंबंधी संशोधनाचा आढावा घेतला जाणार आहे.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

अमरावती मंडल
Tuesday 13/10/2026

जी. एच. रायसोनी विद्यापीठ में इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता आयोजित



प्रतिनिधि/दि.१३

अमरावती - जी. एच. रायसोनी विद्यापीठ के विधि विद्यालय ने हाल ही में दो दिवसीय इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता का आयोजन किया. इस प्रतियोगिता का उद्देश्य विधि के छात्रों में वकालत कौशल, कानूनी शोध क्षमता, विश्लेषणात्मक सोच, न्यायालय शिष्टाचार और आत्मविश्वास का विकास करना था. प्रतियोगिता ने छात्रों को कानूनी तर्क प्रस्तुत करने, प्रावधानों की व्याख्या करने तथा न्यायाधीशों के प्रश्नों का उत्तर देने का व्यावहारिक मंच प्रदान किया.

प्रतियोगिता का शुभारंभ विद्यापीठ के कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल तथा विधि विद्यालय के डीन डॉ. नित्यानंद पांडे की उपस्थिति में उद्घाटन सत्र से हुआ. डॉ. जायसवाल ने औपचारिक रूप से प्रतियोगिता का उद्घाटन किया, जिसके बाद डीन ने छात्रों को संबोधित किया. गणमान्य व्यक्तियों ने छात्रों को उत्साहपूर्वक भाग लेने के लिए प्रोत्साहित किया तथा कानूनी शिक्षा में मूट कोर्ट प्रतियोगिताओं के महत्व पर बल दिया. उन्होंने कहा कि ऐसे आयोजन वकालत कौशल, कानूनी तर्क, शोध क्षमता और व्यावसायिक नैतिकता का विकास करते हैं, जो सफल कानूनी करियर के लिए आवश्यक हैं. प्रथम दिन तीन प्रतिष्ठित अधिवक्ताओं एडवोकेट प्रथमेश गणेशकर, एड. शीतल पार्लीवाल तथा एडवोकेट अनिकेत जुंघारे की उपस्थिति से कार्यक्रम की गरिमा बढ़ी. प्रतियोगिता में तीन-तीन सदस्यों वाली कुल पांच टीमों ने भाग लिया. छात्रों ने न्यायाधीशों के समक्ष अपने तर्क प्रस्तुत कर कानूनी सिद्धांतों की समझ, शोध एवं प्रारूपण कौशल तथा न्यायालयीन प्रस्तुति का प्रदर्शन किया. न्यायाधीशों ने टीमों का मूल्यांकन कानूनी ज्ञान, तर्कों की स्पष्टता, प्रासंगिक कानूनों की व्याख्या, प्रस्तुति कौशल, न्यायालयीन आचरण तथा प्रश्नों के प्रभावी उत्तर देने की क्षमता के आधार पर किया. प्रारंभिक दौरों ने प्रतिभागियों को कानूनी तर्क-वितर्क का वास्तविक अनुभव प्रदान किया तथा उनके आत्मविश्वास व पेशेवर संचार को मजबूत बनाया.

द्वितीय दिन अतिथि एवं न्यायाधीश के रूप में एड. सुयोग माथुरकर तथा एड. कार्तिक गजबिये ने प्रदर्शनों का मूल्यांकन किया. प्रारंभिक प्रदर्शन के आधार पर चार टीमें सेमीफाइनल में पहुंचीं. इन टीमों ने अधिक आत्मविश्वास के साथ तर्क प्रस्तुत कर अपनी कानूनी समझ, विश्लेषणात्मक क्षमता तथा वकालत कौशल का प्रदर्शन किया. फाइनल के लिए टीम 'ए' तथा टीम 'डी' का चयन हुआ. दोनों टीमों ने समर्पण, आत्मविश्वास तथा कानूनी मुद्दों की गहरी समझ के साथ तर्क प्रस्तुत किए. न्यायाधीशों के सावधानीपूर्वक मूल्यांकन के पश्चात टीम 'ए' को विजेता तथा टीम 'डी' को उपविजेता घोषित किया गया. यह परिणाम छात्रों द्वारा प्रदर्शित कड़ी मेहनत, तैयारी, टीमवर्क तथा वकालत कौशल की मान्यता था. इस दो दिवसीय इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता का समन्वय सहायक प्रोफेसर एड. शीतल वारंकर ने किया. प्रतियोगिता ने विद्यापीठ के विधि छात्रों के व्यावहारिक अधिगम अनुभव को सुदृढ़ किया. प्रतिष्ठित अधिवक्ताओं की भागीदारी तथा विद्यापीठ अधिकारियों के मार्गदर्शन ने इस आयोजन को सूचनाप्रद एवं प्रेरणादायक बनाया. छात्रों को न्यायालयीन प्रक्रियाओं की जानकारी मिली, कानूनी शोध एवं प्रारूपण कौशल में सुधार हुआ, मौखिक वकालत क्षमता बढ़ी तथा न्यायिक मंच के समक्ष तर्क प्रस्तुत करने का आत्मविश्वास विकसित हुआ.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

जनशक्ति

Tuesday 13/10/2026

रायसोनी महाविद्यालयात प्रकल्पांचे संशोधनात्मक सादरीकरण

एआय, सायबर सुरक्षा, स्मार्ट ऊर्जा, ईव्ही, रोबोटिक्ससह विविध तंत्रज्ञानाधारित प्रकल्पांचे प्रदर्शन

जळगाव । प्रतिनिधी
दि.३०

येथील जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्ट प्रेझेंटेशन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विविध अभियांत्रिकी विभागांतील विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन व नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारित प्रकल्पांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांमधून प्रत्यक्ष जीवनातील विविध समस्या सोडविण्यासाठी तंत्रज्ञानाधारित उपाययोजना मांडल्या. या प्रदर्शनाचे उद्घाटन



जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अकॅडमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत, सिव्हिल अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. शंतनू पवार, मॅकेनिकल अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. मुकुंद पाटील, इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. बिपासा पात्रा, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. चेतन चौधरी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. तुषार पाटील, डेटा सायन्स व आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागप्रमुख प्रा. डॉ. स्वाती पाटील उपस्थित होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभागातील विद्यार्थ्यांनी एआय-ड्रिव्हन स्मार्ट टिकटिंग अँड कस्टमर सपोर्ट सिस्टम, रिअल-टाइम साइन लँग्वेज इंटरप्रिटर, सायबरसेंटिनेल : रिअल-टाइम स्कॅम डिटेक्शन अँड इन्सिडेंट व्हिज्युअलायझेशन, मेडॉ एआय : इंटेलिजंट मेडिसिन सप्लाय चेन अँड हॉस्पिटल इन्व्हेंटरी मॅनेजमेंट, अॅग्रीगुरू : एआय बेस्ड स्मार्ट अॅग्रीकल्चर डिसिजन सपोर्ट सिस्टम, एआय लीगल अॅडव्हायझर आदी प्रकल्प सादर केले. संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी एआय-पॉवर्ड कॉर्पोरेट कार्बन फूटप्रिंट इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म, स्मार्ट हॉस्पिटल मॅनेजमेंट, व्हेईकल पार्किंग मॅनेजमेंट, एआय-पॉवर्ड डेव्हऑप्स इन्सिडेंट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्म, स्मार्ट सोलर ऑपरेशन्स प्लॅटफॉर्म यांसारख्या प्रकल्पांचे सादरीकरण केले.

raisoni EDUCATION

Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक लोकशाही
Thursday 15/10/2026

आवडी, कौशल्ये, बलस्थाने ओळखून आपले क्षेत्र निवडावे!

जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्र उत्साहात

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळिवण्यासोबतच भविष्यातील करिअरची योग्य दिशा निवडता यावी, या उद्देशाने जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव येथे महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सामनेर येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेची प्रभावी तयारी, स्वतःच्या क्षमतांची ओळख, अकरावीम ध्ये योग्य शाखेची निवड आणि बदलत्या काळातील करिअरच्या संधी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



या कार्यक्रमाचे उद्घाटन जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सोनल तिवारी यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअर संधी, आवड आणि क्षमतेनुसार योग्य विषयांची निवड करण्याचे महत्त्व तसेच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी कशी करावी, याबाबत सविस्तर माहिती दिली. दहावीचे वर्ष हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचे वळण असून, या टप्प्यावर योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येय निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी प्रा. रफिक शेख आणि प्रा. राहुल यादव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअर मार्गदर्शन सत्र घेतले. बोर्ड परीक्षेत चांगले गुण मिळिवण्यासाठी अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आवडी, कौशल्ये आणि बलस्थानांची ओळख करून त्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्राची निवड करावी, असा सल्ला दिला.

या उपक्रमात महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सामनेर येथील एकूण ४७ विद्यार्थ्यांसह शाळेचे मुख्याध्यापक आणि तीन शिक्षक सहभागी झाले होते. मार्गदर्शन सत्रानंतर विद्यार्थ्यांनी जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसराला भेट दिली. यावेळी महाविद्यालयातील आधुनिक पायाभूत सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध असलेल्या विविध वैशिष्ट्यांची माहिती त्यांना देण्यात आली. महाविद्यालयातील सुविधा आणि शैक्षणिक उपक्रम पाहून विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी सम धान व्यक्त केले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच योग्य करिअरची दिशा मि ळावी आणि भविष्यातील संधींची जाणीव व्हावी, या उद्देशाने जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयातर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. या संपूर्ण उपक्रमाचे समन्वय प्रा. संदीप पाटील, प्रा. मीनाक्षी पाटील आणि अनिल सोनार यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या संचालिका पलकजी रायसोनी यांनी प्राचार्या प्रा. सोनल तिवारी तसेच म ार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना योग्य वेळी करिअरविषयक मार्गदर्शन मिळणे त्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

विदर्भ मतदार
Thursday 15/10/2026

जी. एच. रायसोनी विद्यापीठात इंट्रा मूट कोर्ट स्पर्धा



नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. १४ : जी एच रायसोनी विद्यापीठाच्या विधि विद्यालयाने अलीकडे दोन दिवसीय इंट्रा मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन केले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना कायदेशीर युक्तिवाद सादर करणे, तरतुदींचे अर्थनिर्णयन करणे आणि न्यायाधीशांच्या प्रश्नांना उत्तर देणे यासाठी व्यावहारिक व्यासपीठ मिळाले.

स्पर्धेचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल आणि विधि विद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नित्यानंद पांडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन सत्राने झाला. डॉ. जायसवाल यांनी औपचारिकरीत्या स्पर्धेचे उद्घाटन केले, त्यानंतर अधिष्ठातांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले आणि कायदेशीर शिक्षणामध्ये मूट कोर्ट स्पर्धांच्या महत्त्वावर भर दिला.

पहिल्या दिवशी ॲड. प्रथमेश गणेशकर, ॲड. शीतल पालीवाल आणि ॲड. अनिकेत जुंघारे यांनी उपस्थिती दर्शविली. स्पर्धेत प्रत्येकी तीन सदस्य असलेल्या एकूण पाच संघांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी न्यायाधीशांसमोर आपले युक्तिवाद सादर करून कायदेशीर तत्त्वांची समज, संशोधन आणि मसुदा कौशल्य तसेच न्यायालयीन सादरीकरणाचे प्रदर्शन केले. प्राथमिक फेऱ्यांमुळे सहभागी विद्यार्थ्यांना कायदेशीर युक्तिवाद-वितर्कांचा वास्तविक अनुभव मिळाला.

दुसऱ्या दिवशी अतिथी आणि न्यायाधीश म्हणून ॲड. सुयोग माथुरकर आणि ॲड. कार्तिक गजभिये यांनी कामगिरीचे मूल्यमापन केले. प्राथमिक कामगिरीच्या आधारे चार संघ सेमीफाइनल फेरीत पोहोचले. या संघांनी अधिक आत्मविश्वासाने युक्तिवाद सादर करून आपली कायदेशीर समज, विश्लेषणात्मक क्षमता आणि वकिली कौशल्याचे प्रदर्शन केले. अंतिम फेरीसाठी संघ ए आणि संघ डीची निवड झाली. दोन्ही संघांनी समर्पण, आत्मविश्वास आणि कायदेशीर मुद्द्यांची सखोल समज यांच्यासह युक्तिवाद सादर केले. न्यायाधीशांच्या काळजीपूर्वक मूल्यमापनानंतर संघ एला विजेता आणि संघ डीला उपविजेता घोषित करण्यात आले.

या दोन दिवसीय इंट्रा मूट कोर्ट स्पर्धेचे समन्वय सहायक प्राध्यापक ॲड. शीतल वारंकर यांनी केले. स्पर्धेने विद्यापीठातील विधि विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक अध्ययनाच्या अनुभवांना बळकटी दिली.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

दैनिक पुण्यप्रताप
Thursday 15/10/2026

जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्र उत्साहात

जळगाव : विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत उत्तम यश मिळविण्यासोबतच भविष्यातील करिअरची योग्य दिशा निवडता यावी, या उद्देशाने जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव येथे महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सामनेर येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेची प्रभावी तयारी, स्वतःच्या क्षमतांची ओळख, अकरावीमध्ये योग्य शाखेची निवड आणि बदलत्या काळातील करिअरच्या संधी यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



या कार्यक्रमाचे उद्घाटन जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सोनल तिवारी यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअर संधी, आवड आणि क्षमतेनुसार योग्य विषयांची निवड करण्याचे महत्त्व तसेच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी कशी करावी, याबाबत सविस्तर माहिती दिली. दहावीचे वर्ष हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचे वळण असून, या टप्प्यावर योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येय निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी प्रा. रफिक शेख आणि प्रा. राहुल यादव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअर मार्गदर्शन सत्र घेतले. बोर्ड परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले.

या संपूर्ण उपक्रमाचे समन्वय प्रा. संदीप पाटील, प्रा. मीनाक्षी पाटील आणि अनिल सोनार यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जी. एच. रायसोनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या संचालिका श्रीमती पलकजी रायसोनी यांनी प्राचार्या प्रा. सोनल तिवारी तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना योग्य वेळी करिअरविषयक मार्गदर्शन मिळणे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

सकाळ
Friday 16/10/2026



जळगाव : रायसोनी महाविद्यालयात एआय व सायबर सुरक्षेसंबंधी विषयांवरील चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. चरणसिंग कायते. शेजारी उपस्थित मान्यवर.

रायसोनी महाविद्यालयात एआय, सायबर सुरक्षेसंबंधी चर्चासत्र

सहादिवसीय चर्चासत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

जळगाव, ता. १५ : जी. एच. रायसोनी महाविद्यालयातील कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स विभागाच्या वतीने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अटल योजनेअंतर्गत 'एआय फॉर डिजिटल फॉरेन्सिक्स अँड सायबर सिक्युरिटी : इमर्जिंग ट्रेंड्स अँड प्रॅक्टिकल ॲप्लिकेशन्स' या विषयावरील सहा दिवसीय ऑफलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे (एफडीपी) उद्घाटन झाले.

प्रमुख पाहुणे व म्हणून गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्सचे सहाय्यक प्राध्यापक आणि सायबर सुरक्षा व डिजिटल फॉरेन्सिक्स क्षेत्रातील तज्ज्ञ प्रा. डॉ. चरणसिंग एन. कायते, तर अध्यक्षस्थानी संचालिका प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल होत्या.

प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय शेखावत यांनी केले. डॉ. कायते, प्रा. अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या एफडीपीमध्ये डिजिटल फॉरेन्सिक्सची मूलतत्त्वे, सायबर सुरक्षा, एआयचा फॉरेन्सिक तपासातील वापर, मोबाइल फॉरेन्सिक इन्व्हेस्टिगेशन, मशीन लर्निंग, मालवेअर विश्लेषण, सायबर धोक्यांची माहिती आणि इंटुजन डिटेक्शन यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. तसेच प्रत्यक्ष प्रशिक्षण,प्रयोगशाळेतील उपक्रम आणि औद्योगिक भेटीचाही कार्यक्रमात समावेश आहे.

नवभारत

Friday 16/10/2026

रायसोनी बना चैम्पियन

नागपुर. जीएच रायसोनी स्किलटेक यूनिवर्सिटी के स्कूल ऑफ फार्मेसी की ओर से विवि परिसर में महिला अंतर-महाविद्यालयीन क्रिकेट और वॉलीबॉल स्पर्धा का आयोजन हुआ. इसमें क्रिकेट की 8 और वॉलीबॉल की 6 टीमों ने हिस्सा लिया. क्रिकेट में एसकेबी कॉलेज ऑफ फार्मेसी, गाड़ा ने विजेता का खिताब जीता, जबकि मेजबान जीएच रायसोनी स्किलटेक यूनिवर्सिटी की टीम उपविजेता रही. वहीं वॉलीबॉल में रायसोनी यूनिवर्सिटी की टीम विजेता और तुलसीरामजी गायकवाड़-पाटिल कॉलेज ऑफ फार्मेसी, मोहगांव की टीम उपविजेता रही. आयोजन को रायसोनी एजुकेशन के अध्यक्ष सुनील रायसोनी और कार्यकारी निदेशक श्रेयस रायसोनी का सहयोग मिला.

देशोन्नती
Friday 16/10/2026

मूट कोर्ट स्पर्धेत 'स्कूल ऑफ लॉ'च्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

अजय सिंह याचा 'सर्वोत्कृष्ट वैयक्तिक वक्ता' पुरस्काराने गौरव



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'स्कूल ऑफ लॉ' मधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील मूट कोर्ट स्पर्धेत दमदार कामगिरी करत तीन पुरस्कार पटकावून विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे.

जी. एच. रायसोनी महाविद्यालय, येथे २६ सप्टेंबर रोजी डॉ. बी. आर. आंबेडकर स्मृती राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्कूल ऑफ लॉच्या संघाने उपविजेतेपद आणि सर्वोत्कृष्ट लिखीत सादरीकरण पुरस्कार पटकावला. शिवाय, अजय सिंह यांचा 'सर्वोत्कृष्ट वैयक्तिक वक्ता' या पुरस्काराने गौरव करण्यात आला. बी.ए. एलएल.बी. पाचव्या सत्रातील विद्यार्थी अजय सिंह आणि कार्तिक ठाकूर यांनी वक्ते म्हणून, तर नवव्या सत्रातील विद्यार्थिनी गौरी भारती यांनी संशोधक म्हणून संघाचे प्रतिनिधित्व केले.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

अमरावती मंडल
Friday 16/10/2026

जी. एच. रायसोनी विद्यापीठ में इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता आयोजित



प्रतिनिधि/दि.१३

अमरावती - जी. एच. रायसोनी विद्यापीठ के विधि विद्यालय ने हाल ही में दो दिवसीय इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता का आयोजन किया. इस प्रतियोगिता का उद्देश्य विधि के छात्रों में वकालत कौशल, कानूनी शोध क्षमता, विश्लेषणात्मक सोच, न्यायालय शिष्टाचार और आत्मविश्वास का विकास करना था. प्रतियोगिता ने छात्रों को कानूनी तर्क प्रस्तुत करने, प्रावधानों की व्याख्या करने तथा न्यायाधीशों के प्रश्नों का उत्तर देने का व्यावहारिक मंच प्रदान किया.

प्रतियोगिता का शुभारंभ विद्यापीठ के कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल तथा विधि विद्यालय के डीन डॉ. नित्यानंद पांडे की उपस्थिति में उद्घाटन सत्र से हुआ. डॉ. जायसवाल ने औपचारिक रूप से प्रतियोगिता का उद्घाटन किया, जिसके बाद डीन ने छात्रों को संबोधित किया. गणमान्य व्यक्तियों ने छात्रों को उत्साहपूर्वक भाग लेने के लिए प्रोत्साहित किया तथा कानूनी शिक्षा में मूट कोर्ट प्रतियोगिताओं के महत्व पर बल दिया. उन्होंने कहा कि ऐसे आयोजन वकालत कौशल, कानूनी तर्क, शोध क्षमता और व्यावसायिक नैतिकता का विकास करते हैं, जो सफल कानूनी करियर के लिए आवश्यक हैं. प्रथम दिन तीन प्रतिष्ठित अधिवक्ताओं एडवोकेट प्रथमेश गणेशकर, एड. शीतल पालीवाल तथा एडवोकेट अनिकेत जुंघारे की उपस्थिति से कार्यक्रम की गरिमा बढ़ी. प्रतियोगिता में तीन-तीन सदस्यों वाली कुल पांच टीमों ने भाग लिया. छात्रों ने न्यायाधीशों के समक्ष अपने तर्क प्रस्तुत कर कानूनी सिद्धांतों की समझ, शोध एवं प्रारूपण कौशल तथा न्यायालयीन प्रस्तुति का प्रदर्शन किया. न्यायाधीशों ने टीमों का मूल्यांकन कानूनी ज्ञान, तर्कों की स्पष्टता, प्रासंगिक कानूनों की व्याख्या, प्रस्तुति कौशल, न्यायालयीन आचरण तथा प्रश्नों के प्रभावी उत्तर देने की क्षमता के आधार पर किया. प्रारंभिक दौरों ने प्रतिभागियों को कानूनी तर्क-वितर्क का वास्तविक अनुभव प्रदान किया तथा उनके आत्मविश्वास व पेशेवर संचार को मजबूत बनाया.

द्वितीय दिन अतिथि एवं न्यायाधीश के रूप में एड. सुयोग माथुरकर तथा एड. कार्तिक गजबिये ने प्रदर्शनों का मूल्यांकन किया. प्रारंभिक प्रदर्शन के आधार पर चार टीमें सेमीफाइनल में पहुंचीं. इन टीमों ने अधिक आत्मविश्वास के साथ तर्क प्रस्तुत कर अपनी कानूनी समझ, विश्लेषणात्मक क्षमता तथा वकालत कौशल का प्रदर्शन किया. फाइनल के लिए टीम 'ए' तथा टीम 'डी' का चयन हुआ. दोनों टीमों ने समर्पण, आत्मविश्वास तथा कानूनी मुद्दों की गहरी समझ के साथ तर्क प्रस्तुत किए. न्यायाधीशों के सावधानीपूर्वक मूल्यांकन के पश्चात टीम 'ए' को विजेता तथा टीम 'डी' को उपविजेता घोषित किया गया. यह परिणाम छात्रों द्वारा प्रदर्शित कड़ी मेहनत, तैयारी, टीमवर्क तथा वकालत कौशल की मान्यता था. इस दो दिवसीय इंट्रा मूट कोर्ट प्रतियोगिता का समन्वय सहायक प्रोफेसर एड. शीतल वारंकर ने किया. प्रतियोगिता ने विद्यापीठ के विधि छात्रों के व्यावहारिक अधिगम अनुभव को सुदृढ़ किया. प्रतिष्ठित अधिवक्ताओं की भागीदारी तथा विद्यापीठ अधिकारियों के मार्गदर्शन ने इस आयोजन को सूचनाप्रद एवं प्रेरणादायक बनाया. छात्रों को न्यायालयीन प्रक्रियाओं की जानकारी मिली, कानूनी शोध एवं प्रारूपण कौशल में सुधार हुआ, मौखिक वकालत क्षमता बढ़ी तथा न्यायिक मंच के समक्ष तर्क प्रस्तुत करने का आत्मविश्वास विकसित हुआ.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

विदर्भ मतदार
Friday 16/10/2026

जी. एच. रायसोनी विद्यापीठात इंट्रा मूट कोर्ट स्पर्धा



नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. १४ : जी एच रायसोनी विद्यापीठाच्या विधि विद्यालयाने अलीकडे दोन दिवसीय इंट्रा मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन केले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना कायदेशीर युक्तिवाद सादर करणे, तरतुदींचे अर्थनिर्णयन करणे आणि न्यायाधीशांच्या प्रश्नांना उत्तर देणे यासाठी व्यावहारिक व्यासपीठ मिळाले.

स्पर्धेचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल आणि विधि विद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नित्यानंद पांडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन सत्राने झाला. डॉ. जायसवाल यांनी औपचारिकरीत्या स्पर्धेचे उद्घाटन केले, त्यानंतर अधिष्ठातांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले आणि कायदेशीर शिक्षणामध्ये मूट कोर्ट स्पर्धांच्या महत्त्वावर भर दिला.

पहिल्या दिवशी ॲड. प्रथमेश गणेशकर, ॲड. शीतल पालीवाल आणि ॲड. अनिकेत जुंघारे यांनी उपस्थिती दर्शविली. स्पर्धेत प्रत्येकी तीन सदस्य असलेल्या एकूण पाच संघांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी न्यायाधीशांसमोर आपले युक्तिवाद सादर करून कायदेशीर तत्त्वांची समज, संशोधन आणि मसुदा कौशल्य तसेच न्यायालयीन सादरीकरणाचे प्रदर्शन केले. प्राथमिक फेऱ्यांमुळे सहभागी विद्यार्थ्यांना कायदेशीर युक्तिवाद-वितर्काचा वास्तविक अनुभव मिळाला.

दुसऱ्या दिवशी अतिथी आणि न्यायाधीश म्हणून ॲड. सुयोग माथुरकर आणि ॲड. कार्तिक गजभिये यांनी कामगिरीचे मूल्यमापन केले. प्राथमिक कामगिरीच्या आधारे चार संघ सेमीफाइनल फेरीत पोहोचले. या संघांनी अधिक आत्मविश्वासाने युक्तिवाद सादर करून आपली कायदेशीर समज, विश्लेषणात्मक क्षमता आणि वकिली कौशल्याचे प्रदर्शन केले. अंतिम फेरीसाठी संघ ए आणि संघ डीची निवड झाली. दोन्ही संघांनी समर्पण, आत्मविश्वास आणि कायदेशीर मुद्द्यांची सखोल समज यांच्यासह युक्तिवाद सादर केले. न्यायाधीशांच्या काळजीपूर्वक मूल्यमापनानंतर संघ एला विजेता आणि संघ डीला उपविजेता घोषित करण्यात आले.

या दोन दिवसीय इंट्रा मूट कोर्ट स्पर्धेचे समन्वय सहायक प्राध्यापक ॲड. शीतल वारंकर यांनी केले. स्पर्धेने विद्यापीठातील विधि विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक अध्ययनाच्या अनुभवांना बळकटी दिली.

raisoni EDUCATION
Nagpur | Pune | Jalgaon | Amravati | Pandhurna | Bhandara

लोकमत
Saturday 17/10/2026

'जी. एच. रायसोनी'त शिक्षकांसाठी कार्यशाळा



